विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याण
व विकासासाठी महामंडळाची स्थापना....

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण,सांस्कृतिककार्य,क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-व्हीजेडब्ल्यू१०८३/८५/का-७
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२,दिनांक : १ ऑक्टोबर,१९८३

वाचा : संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांक-विजाभजमम/
८३-८४/का-४ दिनांक १३ जुलै १९८३

शासन निर्णय : महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ धर्तीवर केवळ विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी एक विकास महामंडळ स्थापन करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्या प्रश्नाचा साकल्याने विचार करून शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आर्थिक उन्नती व विकास करण्याच्या दृष्टीने "वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ" या नावाचे एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे खालील बाबीसही शासन मंजुरी देत आहे.:-

[अ] सदर महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.२ कोटीचे असेल.

[ब] या महामंडळाचे संचालक मंडळ ३ पेक्षा कमी किंवा १५ पेक्षा अधिक नसेल. संचालकांच्या नेमणुका महाराष्ट्राचे राज्यपाल करतील.

[क] महामंडळाचे मुख्य कार्यालय सध्या मुंबई येथे असेल.

२. या महामंडळाच्या संचालक मंडळावर खालील व्यक्तींची नेमणुक करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| [१] | मंत्री,समाजकल्याण | .. अध्यक्ष |
| [२] | राज्यमंत्री,समाजकल्याण | .. उपाध्यक्ष |
| [३] | सचिव,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व पर्यटन विभाग | .. संचालक |
| [४] | संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे | .. संचालक |
| [५] | श्री ण.ल.पिंपळे, व्यवस्थापकीय संचालक,महात्मा फुले | .. व्यवस्थापकीय- |
| [६ | मागासवर्गीय विकास महामंडळ,मुंबई. | संचालक |

श्री ण.ल.पिंपळे हे त्यांच्या स्वत:च्या पदाचा कार्यभार सांभाळून नवीन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळतील.

३. सदर महामंडळ नोंदणीकृत करण्यासाठी व त्या अनुषंगाने किमान कर्मचारी वर्गावर होणारा खर्च महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या निधीमधून करण्यात यावा. सदर महामंडळ नोंदणीकृत झाल्यानंतर झालेला खर्च महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाला परत करण्यात यावा.

[कृ.मा.पहा]..

४.   हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-सीआर-१७६४/८३/ईएक्सपी-११ दिनांक ३०-९-१९८३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ब्र.ना.बहादुर,
सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत-
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व संचालक,
मंत्री,समाजकल्याण यांचे स्वीय सहाय्यक,
राज्यमंत्री,समाजकल्याण यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्री/सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई/महाराष्ट्र-२,नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी,मुंबई,
निवासी लेखापरीक्षाधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई,
संचालक,समाजकल्याण,पुणे,
संचालक,आदिवासी कल्याण,पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाजकल्याण अधिकारी [वर्ग-१],
सर्व जिल्हापरिषदेचे समाजकल्याण अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी,बृहन्मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग,
वित्त विभाग,
नियोजन विभाग,
व्यवस्थापकीय संचालक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,मुंबई.

-------